**प्रेस नोट** **दिनांक २६/०३/२०१९**

**चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**सामाजिक सलोखा बाबत.**

चंदननगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये हेराम बॉईज मित्र मंडळ, दत्त मंदिर चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे याठिकाणी मंडळामध्ये सर्व धर्मीय लोक एकत्र आहेत. त्यांनी दिनांक १६/०३/१९ रोजी शिवजयंती, आंबेडकर जयंती व मुस्लीम धर्मीयांच्या सण, उत्सव, जयंत्या एकत्रीत साजरे करण्याचे ठरवुन दिनांक ११/०२/१९ रोजी पोलीस ठाणेस मिटींग झालेली होती. सदर मिटींग दरम्यान हेराम बॉईज मित्र मंडळाचे अध्यक्ष श्री. ओमकार पठारे, वैभव कचरे, सुयश सेनलकर, ओमकार केसरकर, करीम सय्यद, शाहरुख शेख स्वप्नील कांबळे, गणेश टेकाळे यांनी पोलीस ठाणे येथे वपोनि. चंदननगर यांना खात्री दिलेली होती. त्याप्रमाणे सदर मंडळाचे सर्व धर्मीय सदस्यांनी एकत्रीत येवुन दिनांक १६/०३/१९ रोजी शिवजयंती उत्सव साजरा केलेला आहे. तसेच सदर उत्सवादरम्यान त्यांनी सर्व धर्मीयांनी एकत्रीत येवुन अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. सदर उपक्रमाचे या भागामध्ये सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे, व त्यामुळे सामाजिक ऐक्याचा संदेश जनतेमध्ये पोहचण्याचे काम झालेले आहे.

याप्रमाणे सर्वधर्मीयांना एकत्रीत आणुन वपोनि. कृष्णा इंदलकर, पोहवा. हरीदास कदम, पोशि. पांडुरंग नाणेकर यांनी चांगली कामगिरी केलेली असुन, सदर कार्यक्रमाचे फोटो सोबत सादर केले आहेत.



